# मौल्यवान आठवणी - भाग ४

बाबूजींचे पत्र वाचून स्वारी खूष झाली. ते पत्र निदान दहांदा तरी वाचले असेल. पत्र वाचून ह्यांच्या मनांत विचारांचे चक्र सुरु झाले.

सगळ्यांत प्रथम ह्यांनी बाबूजींना पत्र लिहिले आणि सांगितले की हे लवकरच स्पॉन्सरशिपचे पेपर्स पाठवतील म्हणून. तोपर्यंत इतर कोणालाच ह्यांनी कधी स्पॉन्सर केले नव्हते. त्यामुळे कोणते फॉर्म्स लागतात, त्यासाठी कोणकोणते पेपर्स जोडावे लागतात ह्याचा ह्यांनी आढावा घेतला. काही मित्रांना फोन करुन विचारपूस केली. बॅंकेचे स्टेटमेंटस्, नोकरी असल्याचा दाखला, आणि त्या फॉर्ममध्ये ज्या ज्या आवश्यक पेपर्सची माहिती दिली होती ते सगळे पेपर्स गोळा करायला सुरुवात केली.

मी ह्यांना म्हटले, सगळ्यांत प्रथम आपण हे छोटे वन् बीएचके अपार्टमेंट बदलून शेजारच्या बिल्डिंगमध्ये रहायला जाऊ वेकेन्सी असल्यास. कारण आमचे स्वयंपाकघर इतके छोटे होते की, एकच माणूस एका वेळेस तेथे थांबू शके. शेजारच्या बिल्डींगमधील वन् बिएचके सध्याच्या अपार्टमेंटपेक्षां दुप्पट तिप्पट मोठे. ऐसपैस बेडरुम, मोठेच्या मोठे लिव्हिंगरुम आणि स्वयंपाकघर पण छान मोठे आहे आणि डायनिंग टेबल पण ठेवता येतो. शिवाय एका वेळेस निदान दहा पंधरा लोक तरी सहज उभे राहू शकतील. एवढे मोठे स्वयंपाकघर पाहून आम्ही कधी एकदा त्या बिल्डींगमध्ये रहायला जाऊ ह्याची मी वाट पहात होते. मी बिल्डिंगच्या सुपरवाईजरकडे नांवही नोंदवले होते. बहुतेक एखाद्या महिन्यांत सेकंड फ्लोअरचे बी वन् अपार्टमेंटचे लोक जागा सोडणार आहेत असे मला सुपरवाईजरने आठ दिवसांपूर्वीच सांगितले होते. मी मोठ्या जागेत जायला मिळणार म्हणून खूष होते. अर्थात भाडे पण दुप्पट होते. पूर्वी ठीक होते, आम्ही दोघेच होतो पण आतां लीनता आली. मोठी जागा सोईस्कर होईल. त्यामुळे मी सहा महिन्यापूर्वीच मोठ्या जागेसाठी नांव नोंदविले होते. बाबूजी येण्यापूर्वीच नवीन जागेत जातां येणार होते. बाबूजी आल्यावर इतर लोक पण त्यांना भेटायला येतील. मोठ्या जागेत पाहुणचारही व्यवस्थित करता येईल. सगळ्यांच दृष्टींनी नवीन जागा जास्त सोईस्कर होईल.

आम्ही नवीन घरांत रहायला गेलो त्यानंतर लवकरच बाबूजींचे पत्र आले त्यांना व्हिसा मिळाल्याचे त्यांनी कळविले होते. आणि आमच्यामुळे ते अमेरिकेत येऊ शकणार म्हणून बाबूजींनी आम्हांला शतशः धन्यवाद दिले होते. मी तुमचा खूप उपकृत आहे आणि बरेच कांही लिहिले होते. एवढी मोठी व्यक्ती आणि एवढा नम्रपणा. दोन्ही गुण एकाच वेळी एकत्र फारशी आढळत नाहीत. पण बाबूजींच्या बाबतीत मात्र त्यांचा हा गुण खूपदां प्रत्ययास आला.

जून जुलैच्या दरम्यान बाबूजींचे टोरांटोहून पत्र आले, "मी राया बिडयेंबरोबर तुमच्याकडे अमक्या दिवशी येत आहे". काहीशा अशा अर्थाचे पत्र होते. बाबूजी कधी एकदां आमच्याकडे येतील ह्याची आम्ही दोघेही आतुरतेने वाट पहात होतो.

आणि एकदाचा तो दिवस उगवला. माझी दोनतीन दिवसांपासून धांवपळ सुरु होती. ग्रोसरी शॉपिंग, घर स्वच्छ करणे, गुलाबजामुन करणे, आमच्या घरी बाबूजींचा मराठी भावगीतांचा प्रोग्राम होणार म्हणून जे मराठी लोक न्यू यॉर्क, न्यू जर्सी, कनेक्टिकट एरियांत रहातात त्या लोकांना फोन करणे, ह्यांत कसा वेळ गेला ते कळलेच नाही. मी, आम्ही दोघे आणि बाबूजी व राया बिडये, असा चौघांसाठी स्वयंपाक करुन ठेवला बाबूजी संध्याकाळी येणार म्हणून. आल्यावर धांवपळ नको. लीनताचे पण खाणेपिणे केले. थोड्यांच वेळांत हे हॉस्पिटलमधून घरी आले. बाबूजी येणार म्हणून स्वारी नेहमीपेक्षां लवकरच घरी आली होती. मी दरवाजा उघडला आणि हे घरांत हुंगतच आले. मस्त खमंग वास आहे म्हणत स्वयंपाकघरांतील डायनिंग टेबलवरील जेवणाचे सगळे पदार्थ पाहिले. अगं, चार लोकांसाठी एवढा मोठा स्वयंपाक करुन ठेवलास ? मी म्हटलं, इश्य् चार म्हणजे चारच लोकांसाठी थोडचं करतात? चार म्हणजे निदान सहासात लोकांसाठी तरी करायचा असतो माहीत आहे? अगं, हे एवढं जेवण निदान दहा लोकांना तरी पुरेल. बाबूजींना लेफ्टओव्हर द्यायचा विचार आहे काय? मला ह्यांच्या बोलण्यांत तथ्थ आहे हे लक्षांत आले आणि मी ओशाळले. मला काळजी वाटायला लागली उरलेल्या अन्नाचे काय करायचे म्हणून. मी मनाशीच ठरविले, थोडेफार फ्रीजरमध्ये ठेऊ. भात उरला तर फोडणीचा भात करायचा. बाबूजींना काय ह्यांना पण कळणार नाही उरलेल्या भाताचे केले आहे ते. पोळ्या ऊरल्या तर काय करायचे वगैरेबद्दल मी मनातल्या मनांतच बेत करायला सुरुवात केली.

बाबूजी आतां कधीही घरांत येतील. रायाचा फोन आला होता डिरेक्शनसाठी. त्या काळांत आजच्यासारखे जिपीएस् नव्हते. नकाशा फॉलो करीत, इतरांना विचारीत विचारीत यावे लागे. ह्यांनी भावगीतांची टेप लावली. त्याकाळी नोरेल्को कंपनीची रील टु रील टेपरेकॉर्डर आमच्याकडे होती. एकदां टेप सुरु केली की निदान दोन तास तरी चाले. डोअरबेल वाजली आणि लीनताने भोकांड पसरले. मी लीनताला घेतले. ह्यांनी दरवाजा उघडला आणि एकेक करीत बरेच जण घरांत आले. प्रत्येकाच्या हातांत हँडबॅगा, सुटकेसेस, बायकांच्या हातांत पण बॅगा, पर्सेस वगैरे वगैरे. बाबूजींना ह्यांनी निदान प्रत्यक्ष पाहिले तरी होते. मी बाबूजींना आमच्याकडील ४५ आर् पि एम् कव्हर वरील फोटोतच पाहिले होते. मधूनच बाबूजी त्यांची सुटकेस घेऊन आलेले दिसले. हे लगेच पुढे झाले आणि बाबूजींच्या हातांतील सुटकेस घेऊ लागले. बाबूजी म्हणाले, छे, छे, फक्त मला सांगा हे कोठे ठेवायचे तेवढे डॉक्टर. एवढा मोठा माणूस आणि किती नम्र ! लीनताची क्रिब लिव्हिंगरुममध्येच होती. पण बाईसाहेब, क्रिबमध्ये बसायला तयार नाहीत. एका हातांत लीनता आणि दुसऱ्या हाताने मी छोटेमोठे

सामान लिव्हिंगरुममध्ये आणण्यासाठी मदत करु लागले. चार नाही एकंदर तेरा लोक आले होते. ह्यांनी सगळ्यांना पाणी द्यायला सुरुवात केली. बाबूजी पटकन् मदतीला हजर. प्रत्येकानी आपली आपली ओळख करुन दिली. ह्यांनी माझी आणि लीनताची ओळख करुन दिली.

सगळ्यांना लीनता हे नांव खूप आवडले. पहिल्यांदाच हे नांव ऐकत आहोत म्हणाले. बाबूजींच्या गीत रामायणातील, "लीनते, चारुते सीते" ह्यावरुन हे नांव सुचल्याचे सांगितले. बाबूजी खूष झाले हे नांव ऐकून. आणि आम्हांला कृतकृत्य झाल्यासारखे वाटले.

इतके लोक सोबत आल्याबद्दल बाबूजींनी दिलगिरी व्यक्त केली. एक बरे झाले, मी केलेला स्वयंपाक सर्वांना पुरेसा झाला. माझा अंदाज चुकल्याबद्दल बरे वाटले. सगळ्यांनी खूप मदत केली. भांडी घासण्यापासून ते स्वयंपाकघर आवरण्यापर्यंत. खरं म्हणजे मला कोणीच कांही करु दिले नाही. तू लीनताचे कर बाकी आम्ही सगळं सांभाळतो. मला तर माझ्या घरचीच मंडळी आल्यासारखी वाटली. मला प्रश्न पडला इतक्या लोकांची झोपायची सोय कशी करायची? आम्ही बाबूजींना आमची बेडरुम द्यायचे ठरविले होते. लीनता लिव्हींगरुममध्येच क्रिबमध्ये झोपत असे. रात्रीतून ती उठली तर मी बाहेर येई. त्यामुळे आम्ही बाहेर झोपणे जास्त सोईस्कर. पण बाबूजींनी नाही म्हटले. तुम्ही तुमच्या बेडरुममध्येच झोपा. लीनताची क्रिब बेडरुममध्ये न्यायची. आणि बाबूजीं क्रिब बेडरुममध्ये नेण्यासाठी सरसावले. तेरा जण एकाच खोलींत कसे झोपणार हा प्रश्न मला अजूनही भेडसावित होता. जसं कांही मनांतले वाचताच येते, पटकन् रायाच्या आईंनी म्हटलं, तुम्ही कांही काळजी करु नका. आम्ही सगळे अगदी आरांमात जमिनीवर झोपू शकू. आम्हां मुंबईकरांना सवय आहे छोट्याशा खोलीत झोपायची. आणि ही खोली तर मस्त ऐसपेस आहे. शिवाय आम्ही सगळेजण बाडबिस्तरा घेऊनच आलो आहोत. तुम्ही कांही काळजी करु नका. आणि पट्पट् सगळ्यांनी आपआपले स्लिपींग बॅग्ज उघडून झोपायची व्यवस्था पण केली.

बाबूजींचा भावगीतांचा प्रोग्रॅम मस्त रंगला. असा घरगुती प्रोग्रॅम बहुतेक प्रथमच झाला असावा न्यू यॉर्क मध्ये. सगळ्यांसाठी मी, मी कोठे, रायाच्या बहिणीनेच चहा केला. बिस्कीट वगैरे आणखी कोणी. असे जर पाहुणे असले तर कशाला त्रास होईल? शिवाय मी सर्वांत लहान त्यामुळे की काय कोण जाणे, सर्वांनी माझे लाडच केले. लहान असल्याचा हा एक फायदा. सर्वांना माझा स्वयंपाकही खूप आवडला. माझे घर मस्त भरले म्हणून मी अगदी खूष.. घर भरल्याचा जो आनंद असतो तो आगळाच. अजूनही मला स्वयंपाक करायला खूप आवडतो. आणि सगळ्यांना आपल्या घरी बोलवायला आवडते.

बाबूजींचा आमच्या घरी कार्यक्रम झाल्यावर न्यू यॉर्कच्या महाराष्ट्र मंडळातील कार्यक्रम पण जोरदार झाला.

बाबूजींसारखे कलाकार जर आपल्या घरी आले तर ते पाहुण्याऐवजी आपल्या घरचेच होतात हा अनुभव आम्हांला बाबूजींच्या पुढील प्रत्येक ट्रिपमध्ये येत गेला. जवळजवळ दरवर्षी उन्हाळ्यांत दोनचार महिन्यासाठी बाबूजी आमच्याकडे पर्यायाने अमेरिका, कॅनडांत येत राहिले. वीकएंडला प्रोग्रॅमनिमित्त बाबूजी बऱ्याच ठिकाणी जात असत. वीकडेजमध्ये आमच्या घरी मुक्काम असे.

मार्च १९७२ मध्ये आम्ही आमच्या नवीन घरांत, बेसाईड, क्वीन्स (न्यू यॉर्कचा एक भाग) मध्ये रहायला आलो. नीरजच्या वेळेस मी अजून हॉस्पिटलमध्येच होते. आणि दुसरे दिवशी बाबूजी भारतांतून आले. ह्यांनी बाबूजींना एअरपोर्टवरुन पिकअप् केले आणि घरी घेऊन गेले. बाबूजी येणार म्हणून मी स्वयंपाक आणि कांही फराळाचे पदार्थ करुन ठेवलेच होते. अमेरिकेतल्या पद्धतीनुसार मी तिसरे दिवशी नीरजला घेऊन घरी आले. बाबूजींनी मला दारांतच नीरजसहित थांबविले. त्यांनी मला आणि नीरजला ओवाळले. बाबूजींनी स्वत: केलेला शिरा माझ्या तोंडांत घातला. माझा ओवाळून घेण्याचा अमेरिकेतील पहिलाच अनुभव. माझ्या डोळ्यांत पाणीच आले. मी नीरजला घेऊन घरांत आले. देवघरांत नीरजसहित नमस्कार केला. बाबूजींना नमस्कार करायला गेले तर वाकू नये म्हणाले. माझ्या डोक्याला हांत लावून आशीर्वाद दिला. बाबूजीनी नीरजला घेतले आणि सहज विचारले, किती तारखेला नीरज जन्मला म्हणून? मी म्हटलं, "२५ जुलैला". बाबूजी म्हणाले, "अरे, हा परवाच्या दिवशीच जन्मला? माझा आणि नीरजचा वाढदिवस एकाच दिवशीचा". मी मनांत म्हणाले, बाबूजींसारखाच माझा नीरज महान होऊ दे. नम्र होऊ दे.

बाबूजींना आमची पूर्ण बेसमेंट दिली होती. बेसमेंटमध्ये ते तासन् तास रियाज् करीत बसत. पूर्ण घरांत बाबूजींचा आवाज घुमत असे. मला तर स्वर्गांत असल्यासारखे वाटे. बाबूजी मधूनच वर येऊन नीरजला घेऊन बसत. एकदां मला म्हणाले, "वहिनी, मी दोन महिन्यांपासून पहातोय, नीरज एकदाही रडलेला मी ऐकलं नाही. सतत हसंत, खेळत असतो. मी ह्याचे नांव बदलणार आहे. आजपासून ह्याचे नांव मी सदानंद हसमुखलाल जोशी ठेवणार आहे". मी म्हटलं जोशी कां? तर म्हणाले हा खूप गोरा आहे. कोब्रा वाटतो. आणि हंसले. नीरज पण बाबूजींकडे पाहून हंसायला लागला. बाबूजी म्हणाले, "ह्याला नवीन नांव आवडले असे दिसते". त्यानंतर बाबूजी नीरजला ह्या नवीन नावांनेच हांक मारीत असत. दरवर्षी मी नीरजच्या वाढदिवशी देवाजवळ बाबूजींच्या दीर्घ आयुष्यासाठी प्रार्थना करीत असे.

नंतरच्याच वर्षी म्हणजे ऑगस्ट १९७३ च्या दरम्यान बाबूजी माझी आई आणि लहान बहीण, सविताला, घेऊन भारतांतून आले. त्यावेळेस सविता कॉलेजच्या पहिल्या दुसऱ्या वर्षी असेल. ती कोठे अमेरिकेतच राहील म्हणून अमेरिकन कॉन्सुलेटने तिला टुरिस्ट व्हिसा द्यायचे नाकारले. बाबूजींनी कांही फोन केले आणि दुसऱ्याच दिवशी सविताला टुरिस्ट व्हिसा मिळाला आणि ती पण अमेरिकेत

येऊ शकली आईसोबत. माझ्या आईची आणि सविताची अमेरिकेत रहायची बिलकुल इच्छा नव्हती. त्यामुळे दोघींनी कधी व्हिसाचे स्टॅटस् बदलायचा पण विचार केला नाही. माझ्या आईचे सारखे प्रत्येक पत्रांत ह्यांना म्हणणे असे, तुम्ही भारतांत डॉक्टर झाला आहांत तर तुम्ही भारत  भूमीची सेवा करायला हवी. गोऱ्या लोकांची सेवा न करता आपल्या भारतीय लोकांसाठी उपयोगी पडायला हवे. वगैरे वगैरे. शिवाय तिला माझी खूप काळजी वाटायची. म्हणून मी तिला म्हणायची, आई तू येथे येऊन माझा संसार पहा. मग तुझी काळजी मिटेल. शेवटी कशीबशी ती बाबूजींबरोबर यायला तयार झाली ते पण सविता सोबत येऊ शकत असेल तरच. एकदाच्या दोघी येथे आल्या. आईने माझा संसार पाहिला आणि ती निश्चिंत झाली. आईने परत कधी लिहिले नाही भारतांत येण्याबद्दल. पण तरी तिला मनांत कोठे तरी वाईट वाटे. आपला जावई भारतीयांची सेवा न करतां परकीयांची सेवा करीत आहे ह्याची तिला नेहमी खंत वाटे. मी अमेरिकन सिटीझन होऊन चाळीस वर्षे होऊन गेले तरी माझ्या तीन भावांनी, दोन बहिणींनी कधीही साधी अमेरिका पहायची इच्छा दर्शविली नाही. माझ्या बऱ्याच मित्रमैत्रिणींनी सासर माहेर भरले अमेरिकेत. मी एकदोनदां म्हटले निदान टुरिस्ट म्हणून तरी या, हा देश पहा. पण त्यांच्या सर्वांचे एकच म्हणणे असे, तुम्हीच या, म्हणजे सगळेजणच तुम्हांला पाहू शकतील. मला खूप वाईट वाटे. सगळ्यांचे माहेरचे येथे आहे. आपले कोणीच नाही. पण नंतर नंतर संवय झाली. मी परत कधी कोणाला या म्हटलं नाही, ना कधी कोणी आले. पण अजूनही मला, आपल्याला परक्या देशांत रहावे लागते ह्याची खंत आहे. माझ्या मते मी सात जन्माचे पाप केले असणार म्हणून आपल्या माणसांना सोडून इतक्या दूर परदेशांत रहावे लागत आहे मला. हा विचार अजूनही मनांत आला तरी डोळ्यांत पाणी आल्यावांचून रहात नाही.

बाबूजींचे प्रोग्रॅम्स खूप रंगत असत. बाबूजींमुळे आम्ही खूप फेमस झालो. मला आठवते, बाबूजींनी संपूर्ण गीत रामायणाचा प्रोग्रम फिलाडेल्फियाला केला. आम्ही न्यू यॉर्कहून तेथे पोहोंचायला खूप वेळ लागला. हे हॉस्पिटलमधून उशीरा घरी आले आणि ट्रॅफिक ह्यामुळे आम्ही उशीरा पोहोंचलो. आम्ही पोहोंचेपर्यंत बाबूजींनी प्रोग्रॅम सुरु केला नाही. आम्हां दोघांनाही खूप लाजल्यासारखे झाले. आम्ही पोहोंचेपर्यंत जेवणं उरकून घेऊ असे बाबूजींचे म्हणणे. लीनता दोन वर्षाची पण नव्हती. ती बाबूजींच्या पेटीसमोर बसून अगदी तन्मयतेने गाणी ऐकत होती. मध्यतरांत लीनताला आम्ही कारमधून बाहेर फिरविले ती झोपेल ह्या उद्देशाने. लीनता झोपली पण कार्यक्रम जेव्हां परत सुरु झाला तेव्हां ती परत फ्रेश होऊन गाणी ऐकायला तयार. बाबूजींनी तिचे आवडते गाणे म्हणायला सुरुवात केली, "सेतु बांधा रे, सेतु बांधा रे, सेतु बांधा रे सागरी, सेतु बांधा रे सागरी" आणि लीनता खूष झाली. सगळेजण तिचे कौतुक करीत होते. सकाळी आठनऊ वाजतां गीत रामायणाचा कार्यक्रम संपला. त्यानंतर लीनता न्यू यॉर्कच्या परतीच्या पूर्ण प्रवासांत झोपली.

बाबूजी बेसमेंटमध्ये 'सेतु बांधा रे' ची प्रॅक्टिस करायला लागले की आमची तिन्ही मुलं उड्या मारायला

लागत. बाबूजींना ते पाहून खूप गंमत वाटे. बाबूजी ते गाणे म्हणत आणि आमची तिन्ही मुलं नाचायला सुरुवात करीत. तो एक रुटीनच होऊन गेला आमच्या घरांत. वीकडेजमध्ये बाबूजी बराच वेळ रियाजमध्ये घालवीत. तरी ते घरांत बोअर होत. हे कॉलवर असले की बाबूजी पण ह्यांच्यासोबत हॉस्पिटलमध्ये रात्रभर कॉलरुममध्ये रहात. रुमवर ह्यांच्या आणि बाबूजींच्या मस्त गप्पा रंगत.

पराग आमचा १ जुलै, १९७४चा. मी हॉस्पिटलमध्ये आणि बाबूजी भारतांतून आले. तीन जुलैला मी परागला घेऊन घरी आले. बाबूजींनी मला आणि परागला ओवाळले. माझ्या तोंडात लाडू घातला. मी परागबरोबर देवघरांत जाऊन नमस्कार केला. जेवण वगैरे झाल्यावर बाबूजी मला म्हणाले, "वहिनी, मी दरवेळी भारतांतून येतो तर तुम्ही हॉस्पिटलमध्ये". आतां हे पुरे म्हणाले. आणि बाबूजींचा शब्द शिरसावंद्य मानला आम्ही. पराग झाला त्याचवेळी मला वाटते, बाबूजींच्या पत्नी, ललितावहिनी, मि. विटणकर, त्यांच्या पत्नी, वंदना विटणकर, पण आल्या. मिस्टर विटणकर, प्रख्यात चित्रकार, त्यांचे कॅलेंडर्स ठाकूर विटणकर नांवाने खूप प्रसिध्द, तर वंदनाताई प्रख्यात कवयित्री आणि नाटककार. विटणकरांनी आमच्यासाठी नृत्य करणारा गणपतीचे पेंटींग काढले आणि आम्हांला भेटवस्तू म्हणून दिली. जी अजूनही आमचे फॅमिलीरुम सुशोभित करीत आहे. मि. विटणकरांनी आमच्या घरासमोर बसून घराचा स्केच काढला. आम्हां दोघांचे पेंटिंग्ज काढले आणि आम्हांला दिले. मी त्यांना मॅनहॅटनमध्ये घेऊन गेले. त्यांनी खूपसारे पेंटिंग्ज काढले आणि विकले तेथल्या तेथेच. मि. विटणकर म्हणजे बाबूजींसारखेच साधे, सालस, देवमाणूस. अशी माणसं देवाने जास्त केली नाहीत.

ललितावहिनींनी मला सौ. कमळाबाई ओगलेंचा "रुचिरा" हा पाककलेवरील अभिनव ग्रंथ दिला. त्यावर वहिनींनी लिहिले आहे, "सौ. सुरेखा वहिनीस सप्रेम भेट. २०-१-७४. सौ. ललिता फडकेकडून". त्या पुस्तकाची मी जितकी पारायण केली असतील तितकी डॉ. स्पॉकच्या पुस्तकाची पण केली नसतील. डॉ. स्पॉकचे पुस्तक मी आमचा पराग तीनचार वर्षाचा होईपर्यंत वाचले. नंतर ते पुस्तक मी माझ्या एका मैत्रिणीला दिले ते अजून तिच्याकडेच आहे किंवा तिने आणखी कोणाला तरी दिले असेल. पण ललिता वहिनींनी दिलेल्या रुचिरा पुस्तकाची अजूनही पारायणं चालू आहेत, आजकालच्या युट्युबच्या जगांत पण. ते पुस्तक वापरुन वापरुन खिळखिळे झाले आहे तरीही त्या पुस्तकाची महती संपत नाहीय.

बाबूजींनी, वहिनिंनी बरेचदा त्यांच्या घरी शिवाजी पार्कला यायला सांगितले. दोघांचेही अगदी आवर्जून आग्रहाचे निमंत्रण असे. त्यामुळे आम्ही मुंबईला गेलो की बाबूजींना, वहिनींना भेटायला त्यांच्या घरी जात असू. मला आठवते, आमच्या पहिल्या भेटीत वहिनींनी माझा सगळ्यांत आवडीचा पदार्थ, पुरणाची पोळी, त्यावर भरपूर साजूक तूप आणि ह्यांच्यासाठी झुणका, भाकरी आणि वांग्याची खमंग भाजी केली होती अगदी आठवणीने. स्वयंपाकाचा बेत पाहून मला अगदी गहिंवरुन आले.

आमच्यासोबत माझी मुंबईची सुमनमावशी पण बाबूजींना भेटायला आली होती. मावशी खूप छान गाते आणि तिला गाण्याची खूप आवड. त्यांतून बाबूजी म्हणजे तिचे दैवत. मी बाबूजींना फोन करुन विचारले, सोबत मावशीला आणले तर चालेल कां? बाबूजी पटकन् म्हणाले, जरुर घेऊन या. तुमच्या मावशी म्हणजे माझ्या पण मावशीच. तिथला पाहुणचार पाहून मावशी थक्क झाली. अजूनही मावशी त्याबद्दल बोलत असते. बाबूजींनी आम्हांला, मावशीला त्यांनी नुकतेच केलेले ४५ आणि ७८ आर् पी एम् ची (लाँग प्ले) रेकॉर्ड, भावगीते आणि गीतरामायण दिले. दरवेळेस त्याच्यांकडे गेलो की बाबूजी आम्हांला रेकॉर्डस्, टेप्स् देतात. त्यांनी दिलेला पूर्ण गीतरामायण रेकॉर्डस् चा संच आहे आमच्याकडे.

अशाच एका ट्रिपमध्ये आम्ही बाबूजींकडे गेलेलो असतांना मला वाटते, अँटिबायॉटिकच्या औषधाने बाबूजींच्या कानांवर परिणाम (साईड इफेक्ट) झाला आणि बाबूजींना कमी ऐकायला यायला लागले. बाबूजी म्हणाले, मी पेटीवर काय वाजवित आहे हेच मला ऐकायला येत नाही. मला हे जिवंत मरण आहे असे वाटते. ते ऐकून काळजाला घरं पडली माझ्या.

आणखी एकदां भारतांतून म्हणजे मुंबईहून निघण्याच्या दिवशी ४ मार्च २००२ ला आम्ही दादरला, शिवाजी पार्कला बाबूजींच्या घरी गेलो होतो. बाबूजी म्हणाले आज रात्री ईरॉसमधील प्रायव्हेट हॉलमध्ये 'वीर सावरकर' सिनेमाचा प्रिमीयर शो आहे फक्त मोजक्या लोकांसाठी. तुम्ही या मावशींना घेऊन. माझ्यासोबत माझा लहान भाऊ, सुनील, पण होता. बाबूजींनी सुनीलला पण आवर्जून बोलाविले. दादा, म्हणजे पांडुरंगशास्त्री आठवले पण येणार आहेत. हे म्हणाले, "आज रात्री अकरा वाजतांच आम्हांला एअरपोर्टवर रहावे लागणार आहे. पहाटे दोन वाजताची आमची एअर इंडियाची फ्लाईट आहे. आम्हांला बहुतेक जमणार नाही". बाबूजी म्हणाले, "अकरा वाजतां तुम्हांला मी एअरपोर्टवर पोहोंचवायची व्यवस्था करतो. मग तर झाले?" बाबूजींच्या आग्रहापुढे आम्ही कांही म्हणू शकलो नाही. आम्ही पांचजण, मावशी आणि सुनील ईरॉसमध्ये पोहोंचलो. सिनेमा सुरु व्हायचाच होता. थोड्याच वेळांत दादा पण आले. बाबूजींनी आमची ओळख दादांशी करुन दिली.

सावरकरांच्या जीवनावर सिनेमा काढायची बाबूजींची खूप वर्षापासूनची इच्छा होती. पैसे जमा करायला खूप वेळ लागला कारण गुंतवणूकदारांकडून पैसे घेणे बाबूजींना मान्य नव्हते. री-शुटींग करावे लागले, कारण लहान सावरकराची भूमिका करणारे मोठे झाले म्हणून आणि चित्रण मनासारखे झाले नाही तर ते पुन्हा करण्याचा आग्रह धरणारे बाबूजी खर्च जास्त होतो म्हणून दर्जामध्ये हलकेपणा मान्य करण्यास तयार नव्हते. घटका गेली, पळं गेली..... अशा थाटांत वर्षे गेली. शेवटी हा प्रकल्प कधीच पुरा होणार नाही बाबूजींच्या हट्टी स्वभावामुळे अशी बरीच टीका बाबूजींवर टीकाकारांनी केली.

बाबूजी आम्हांला म्हणाले, "एकदाचा हा चित्रपट पुरा झाला. मी देवाजवळ सारखे मागत असे, हा चित्रपट पूर्ण होईपर्यंत मला नेऊ नकोस. आतां हा चित्रपट पूर्ण झाला. देवा, आतां तू मला कधीही ने. मी तयार आहे". बाबूजींचे बोलणे ऐकून मन खूप विषण्ण झाले. सगळ्याच महापुरुषांची देवाने नेहमी अशीच कां परीक्षा घ्यावी? असे वाटले.

ती आमची शेवटचीच भेट ठरली. देवाने जणू ह्या महापुरुषाची हांक ऐकली. बाबूजींना २९ जुलै, २००२ साली देवाज्ञा झाली आणि एक महापुरुष अनंतांत विलीन झाला.

(क्रमश:)

**सुरेखा मद्दीवार.**